# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/ई-मेल/बातमी/२०२०                                        दिनांक:- ६ जानेवारी,२०२०

जळगाव दि.६ (                ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या जनसंवाद आणि पत्रकारिता विभागाच्यावतीने सोमवारी पत्रकार दिना निमित्त “मराठी पत्रकारितचे आयाम” या विषयावर विद्यापीठस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.

प्रभारी कुलसचिव प्रा.बी.व्ही.पवार यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उदघाटन झाले. अध्यक्षस्थानी कला व मानव्यविद्या प्रशाळेचे संचालक डॉ.अनिल चिकाटे होते. यावेळी दै.देशोन्नतीचे आवृत्ती प्रमुख, मनोज बारी, दै.जनशक्तीचे निवासी संपादक, डॉ.युवराज परदेशी, विभाग प्रमुख, डॉ.सुधीर भटकर, डॉ.विनोद निताळे, डॉ. सोमनाथ वडनेरे, डॉ. गोपी सोरडे,प्रा.विश्वजित चौधरी, प्रा.विजय घोरपडे, प्रा.सुनील सपकाळे, प्रा.हर्षल सपकाळे, डॉ. सुभाष देवरे, प्रा. अरुण अवसरमल आदी उपस्थित होते. उदघाटन प्रसंगी प्रभारी कुलसचिव प्रा.पवार यांनी समाजातील चांगल्या-वाईट घटनांचे प्रतिबिंब पत्रकारितेद्वार उमटत असते. कालची मुद्रित पत्रकारिता आजच्या तंत्रज्ञानाच्या डिजिटल युगापर्यंत पोहचली आहे. आज समाजातील घडामोडी वेगवान पद्धतीने माहिती होत असतात. इलेक्ट्रॉनिक्स पत्रकारिता जरी बहरत असली तरी वृत्तपत्र वाचनात खरा आनंद मिळतो असे सांगीतले. डॉ.सुधीर भटकर यांनी प्रस्तावनेत चर्चासत्र घेण्यामागील उद्देश सांगतांना बाळशास्त्री जांभेकर यांच्याविषयी माहिती दिली. डॉ.अनिल चिकाटे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगीतले की, समाजापर्यंत त्वरीत बातमी पोहचावी अशी सामाजिक माध्यमे विकसित झाली आहेत. “ग्रामीण पत्रकारीता” याविषयी चर्चा करतांना मनोज बारी म्हणाले की, ग्रामीण पत्रकारांनी अद्ययावत राहीले पाहिजे. शहरी आणि ग्रामीण असा पत्रकारितेमध्ये फरक राहीला नाही. तंत्रज्ञानामुळे पत्रकारितेचा विकास झाला आहे. स्पिक टू तंत्रज्ञानामुळे बातमीदारीमध्ये वेगाने माहिती संकलन होते. डॉ. युवराज परदेशी यांनी “संपादकीय लेखन” याविषयावर मार्गदर्शन करतांना सांगितले की, संपादकीय लेखकाला सर्वच क्षेत्रातील चालु घडामोडी अवगत असायला हव्यात. संपादकीय लेखात संदर्भ देखील महत्वाचे असतात. वाचकांना समजेल अशा पध्दतीने संपादकीय लेखन असले पाहीजे. संपादकीय लेख स्पर्धा परीक्षेचे विद्यार्थी, शासकीय

अधिकारी, कर्मचारी, विविध क्षेत्रातील अभ्यासक यांना महत्वाचे ठरत असतात. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन वैशाली पाटील यांनी केले. धनश्री राठोड यांनी आभार मानले.

**समारोप**

जैवशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.विजय माहेश्वरी हे समारोप कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. डॉ.अनिल चिकाटे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांनी अधिकाधिक ज्ञानपूर्ण होण्यासाठी चालू घडामोडीवर लक्ष केंद्रित करुन समाजाला सशक्त माहिती पुरवावी. सरकारचे धोरण, दिशा व दशा बदविण्याची ताकद पत्रकारितेत आहे. समाजाला शिक्षित करण्याचे काम पत्रकारितेचे आहे. असे प्रतिपादन प्रा.डॉ. माहेश्वरी यांनी समारोप प्रसंगी केले. सुत्रसंचलन सरिता सैनी यांनी केले. सुमती बोदडे यांनी आभार मानले.

---------------------------------------------------------------------------------

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी